**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0281 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/04/2024 20:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरुवार **Date From (दिनांक पासून):** 18/04/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/04/2024

**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/04/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/04/2024 20:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय येथील महसुल , सहाय्यक यांचे खोलीत उत्तर ,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अमोगसिध्द मल्लेश कस्तुरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु कामती ब्रा पोस्ट कामती , खुर्द, ता मोहोळ जि सोलापूर ,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु कामती ब्रा पोस्ट कामती , खुर्द, ता मोहोळ जि सोलापूर ,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9423381112

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अतुल अशोक रणसुभे | | | 1. साईसष्टी, ब्लक नं 42, पोतदार इंटरनश्नल स्कुलच्या बाजुला, , राजस्व नगर, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी दि:- 18/04/4024
मी अमोगसिध्द मल्लेश कस्तुरे, वय 48 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मु. कामती ब्रा. पोस्ट कामती खुर्द, ता. मोहोळ जि. सोलापूर मो.क्रं.9423381112, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,
मी दि. 18/04/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस उप अधीक्षक, श्री गणेश कुंभार यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावर श्री गणेश कुंभार यांनी त्यांचे कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांना त्यांचे कक्षामध्ये बोलावुन त्यांची व माझी ओळख करुन देवुन माझी पंचासमक्ष तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करावी असे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,
माझी मावशी श्रीमती लक्ष्मीबाई सिध्दप्पा हेगडी यांची बेलाटी ता. उत्तर सोलापूर येथे शेत जमीन असुन मावशी गुलबर्गा, कर्नाटक राज्य येथे राहण्यास असल्याने त्यांनी मला सदर शेत जमीनीच्या सर्व प्रक्रीयेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता कुलमुखत्यार दिले आहे. सदर शेत जमीनीपैकी गट नं 146/2 मधील 0.14 आर (1400 चौ फुट) क्षेत्र हे सोलापूर - सांगली महामार्गामध्ये संपादीत झाली असुन त्याचा संपुर्ण कायदेशीर मोबादला हा माझी मावशी श्रीमती लक्ष्मीबाई हेगडी यांना मिळालेला आहे. सदर संपादित झालेल्या क्षेत्राच्या अनुषंगाने फेरफार क्रं. 2576 झालेला असुन सदर फेरफार मध्ये संबधीत तलाठी यांनी क्षेत्र 0.14 आर (1400 चौ मि) नोंद करणे आवश्यक असताना 0.01.40 (140 चौ मि) अशी चुकीची नोंद ऑनलाईन 7/12 उता-यावर केली. सदरची नोंद दुरुस्त होणकरीता मी तहसिल कार्यालय उ. सोलापूर येथे महसुल अधिनियम 155 अंतर्गत अर्ज सादर केला असुन माझ्या अर्जावरुन तत्कालीन तहसिलदार यांचे दुरुस्ती आदेश झाले आहेत. सदर झाले आदेशाची प्रत देण्याकरीता उ. तहसिल कार्यालय येथील महसुल सहा. श्री रणसुभे हे माझ्याकडे 15,000/- रु लाचेची मागणी करीत असुन महसुल सहा. रणसुभे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.
त्यानंतर पोनि महाडिक यांनी महसुल सहा. रणसुभे यांचेवर तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे जाणेकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता, तेथे महसुल सहा. रणसुभे त्यांच्या खोलीत उपस्थित नव्हते. त्यामुळे मी माझ्या मोबाईल क्रंमाक 9423381112 वरुन महसुल सहा. रणसुभे यांचा मो.क्रं. 9604111142 वर फोन करुन मी ऑफिसमध्ये आलो असल्याबाबत सांगीतले असता त्यांनी साहेबांकडे आहे 5 ते 10 मिनिटात येतो असे सांगुन फोन कट केला.
त्यानंतर बराच वेळ होवुन देखील रणसुभे हे त्यांच्या खोलीकडे आले नसल्याने मी पुन्हा त्यांना फोन केला परंतु तो त्यांनी रिसिव्ह केला नाही. त्यामुळे मी काहीवेळ वाट पाहुन पुन्हा रणसुभे यांना फोन केला असता तो त्यांनी रिसिव्ह करुन येत असल्याबाबत सांगीतले. त्यामुळे मी व पंच असे रणसुभे यांची तेथेच वाट पाहत थांबलो. त्यानंतर काहीवेळाने रणसुभे हे त्यांचे खोलीमध्ये येवुन त्यांचे खुर्चीवर बसले. सदर ठिकाणी माझ्याप्रमाणे रणसुभे यांची बरेच लोक त्यांच्या कामाच्या अनुषंगाने वाट पाहत होते. त्यांचे काम झाल्यानंतर रणसुभे यांनी मला माझ्या प्रलंबित

कामाची ऑर्डर दाखवुन ही तलाठयाकडे द्यायचे असे म्हणुन पुढील कार्यवाही समजावुन सांगीतली. त्यानंतर हाताने पैसे मागणीचा इशारा केला त्यावर मी त्यांना आता काय अस विचारल असता रणसुभे यांनी मला मी परवा बोललो नाही का तुम्हाला 15,000/- असे म्हणुन माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी एटीएम मधुन काढुन आणतो असे सांगुन पंच 01 यांच्यासह पुन्हा अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली. त्यानंतर महसुल सहा. रणसुभे यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 15,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर महसुल सहा. रणसुभे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता तेथे रणसुभे हे त्यांच्या कार्यालयीन खोलीमध्ये हजर होते. तेथे मी व पंच असे गेलो असता मला बघुन रणसुभे यांनी हाताने पैसे मागणीचा इशारा केला. त्यावर मी माझ्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवण्यात आलेली लाच रक्कम काढुन त्यांना दिली व पंधरा तुम्ही म्हणलाव तेवढ दिलो, मोपुन घ्या असे सांगीतले. त्यावर रणसुभे यांनी लाच रक्कम घेवुन त्यांच्या नेसते पॅन्टच्या पाठीमागील डावे बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. व मला माझ्या प्रलंबित कामाची ऑर्डर प्रत देवुन ती तलाठी यांचेकडे देण्यास सांगीतले. व पुढील प्रक्रीया समजावुन सांगत असतेवेळी मी पोनि महाडिक व सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन त्यांनी महसुल सहा. रणसुभे यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी रणसुभे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अतुल अशोक रणसुभे, वय - 41 वर्षे, पद - महसुल सहा. नेमणुक – तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर, रा. साईसृष्टी, ब्लॉक नं. 42, पोतदार इंटरनॅश्नल स्कुलच्या बाजुला, राजस्व नगर, सोलापूर असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी महसुल सहा. रणसुभे यांच्या कार्यालयीन खोलीमध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 18/04/2024 रोजी आरोपी लोकसेवक अतुल अशोक रणसुभे, पद - महसुल सहा. नेमणुक – तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर, यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरुपयोग करून मी महसुल अधिनियम 155 अंतर्गत सादर केलेल्या दुरुस्ती अर्जावरुन तत्कालीन तहसिलदार यांचे झालेल्या दुरुस्ती आदेशाची प्रत देण्याकरीता 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम तहसिल कार्यालय, उ. सोलापूर येथील महसुल सहा. यांचे खोलीमध्ये स्वत: स्विकारुन बेकायदेशीर वर्तन केले आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक अतुल अशोक रणसुभे, पद - महसुल सहा. नेमणुक – तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

समक्ष

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापू

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Umakant Netaji Mahadik
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

कसूरे ट. टम.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ajit shankar lakade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI